उन्नती संस्था
सामाजिक आणि शैक्षणिक बदलासाठी

उन्नती संस्थेद्वारा प्रकाशित -

**पत्र ७, महिना – ऑगस्ट २०१७**

**हे वार्तापत्र शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांसाठी आणि शिक्षणात रस असणाऱ्यांसाठी**

# बिडे वार्तापत्र

**बिडे (कोरकू) = उठा (मराठी)**

===========================

## शिक्षक आणि पालक यांचा सुंदर मिलाफ

शिक्षकांनी पालकांच्या सहकार्याने आपली शाळा सुंदर केल्या आहेत, याची उदाहरणे आम्ही नुकतीच चंद्रपूर जिल्ह्यात पाहिली. तिथल्या कोरपना तालुक्यतील, गोपालपूर, कुकुडसाथ, आसन बु. आणि पिंपळगाव या जि. प. शाळेतील शिक्षकांची काम करण्याची वृत्ती खूपच छान होती. दोन वर्षात त्यांनी शाळेला ISO (International Organization for Standardization) मानांकन (म्हणजे आंतरराष्ट्रीय दर्जा प्रधान करणारी संस्था) मिळवून दिले आहे. हे सर्व करतांना पालकांचा सहभाग, विद्यार्थ्यांची उपस्थिती, गुणवत्ता इत्यादी गोष्टी साध्य करायला खूप कष्ट लागले, परंतु त्यांनी ते काम केले. पालकांच्या प्रथम बैठका घेतल्या त्यासुद्धा सायंकाळी, पालकांच्या वेळेत. पालकांसोबत बगीचा, परसबाग बनविली, त्यासाठी श्रमदान केले, तसेच मुलांसाठी ग्रंथालय सुरु केले. मुलांच्या आवडीनुसार शिकण्या शिकवण्याच्या पद्धती विकसित केल्या. त्यामुळे आज शाळेत उपस्थिती आणि लेखन वाचन या विषयात १००% प्रगती दिसून येत आहे. तसेच शाळेत मुलांचे कौशल्य वाढावे यासाठी मुलांची बचत बँक, विविध खेळांचे व कार्यक्रमांचे आयोजन, संगणक साक्षरता यासारखे उपक्रम घेतले जातात. त्यामुळे पालक, विद्यार्थी आणि विशेष म्हणजे शिक्षक खूप समाधानी आणि आनंदी दिसून आलेत, गोपालपूर शाळेचे




===========================

मुख्याध्यापक श्री. झाडे सर म्हणत होते, कि "पालकांना सुरवातीला बैठकीसाठी बोलवायचो, पण पालक येत नव्हते, म्हणून आम्ही पालकांच्या वेळेत बैठक घेतल्या. आम्हांला येणाऱ्या अडचणी, हवे असणारे सहकार्य याबद्दल पालकांशी बोलू लागलो. पालक मग आमच्या अडचणी सोडविण्यासाठी मदत करू लागले." आसन बु. शाळेतील सहाय्यक शिक्षक सांगत होते की, गावात पालकांची आर्थिक परिस्थिती खूप हलाखीची आहे, तरी सुद्धा पालकांनी आर्थिक स्वरुपात नाही, पण श्रमदान करून लोकसहभाग नोंदविला आहे. त्यांनी एक महिना श्रमदान करून, शाळेत संरक्षण भिंत आणि बगीचा, रोपवाटिका तयार करून दिली." प्रत्येक शाळेतील शिक्षकांचे एकाच म्हणणे होते की, पालकांचा विश्वास धरून, कारभार पारदर्शक असेल तर सहकार्य पूर्णपणे मिळत जातं." पालकांनी सुद्धा शिक्षकांविषयी समाधान व्यक्त केले, आणि स्वत: सुद्धा समाधानी दिसले. ते म्हणाले मुलं आनंदाने शिकत आहेत हे पाहून आनंद वाटतो आणि हे सर्व शिक्षकांमुळे झाले आहे, त्यामुळे शिक्षकांचा अभिमान सुद्धा वाटतो."



### शाळा सुरु होण्याची नेमकी वेळ कोणती?

हा तर मला पडलेला प्रश्नच आहे. कारण आपल्याकडे शाळा सकाळी ११ वाजता उघडतात म्हणजे अध्यापन ११ वाजेनंतरच सुरु होते, काही ठिकाणी शाळा सकाळी १०.३० वाजता उघडतात, आणि ११ वाजता वर्गात अध्यापनाचे काम सुरु होते. मी कामानिमित्त अकोट तालुक्यातील झुमरीतलैय्या गावातील जि. प. च्या शाळेला भेट दिली असता, ११ वाजता मुले आलेली होती, आणि एक शिक्षिका आल्या होत्या, इतर शिक्षक मात्र ११. १० मिनिटांनी, नंतर ५ मिनिटांच्या अंतरावर बाकी शिक्षक आलेत, शाळेत एकूण ५ शिक्षक. ते आल्या आल्या प्रथम उपस्थितीच्या रजिस्टरवर सह्या करून मग वर्गात गेले. मला तर आश्चर्यच वाटले, कि ना घंटा वाजली, ना राष्ट्रगीत, ना प्रार्थना, ना परिपाठ झाला. मुलं आली तशी वर्गात कोंडल्या गेली. ना गावातील पालकांनाही काळात नाही की शाळा भरली, ना मुलांना माहित शाळा भरण्याची नक्की वेळ कोणती. ते तर शिक्षक आले की शाळा भरली असेच समजतात. मी शिक्षकांना विचारले की, "शाळा अशीच भरते का रोज?" त्यावर शिक्षक म्हणाले, "आज जरा उशीर झाला म्हणून लवकर मुलं वर्गात बसली."

शाळेची घंटा वाजणे, परिपाठ होणे या आवश्यक गोष्टी आहेत. शाळेचे वातावरण त्याने तयार होते, एक शिस्त येते. घंटा वाजली की पालकांना कळतं की शाळेची वेळ झाली, शिक्षक आलेत. मुलांनासुद्धा मानसिक दृष्ट्या कळते की शाळा सुरु होणार. एकुणातच सर्वजण (शिक्षक, विद्यार्थी व पालक) शाळा सुरु झाली असे समजतात. त्यामुळे शाळेला एक स्वरूप येतं. त्यामुळे घंटा वाजणे हे खूप महत्वाचे आहे, मी सुद्धा जि. प. शाळेतच शिकलो, पण एकही दिवस असा गेला नाही कि त्या दिवशी घंटा वाजली नाही. पण आपल्या परिसरामध्ये का कुणास ठाऊक बऱ्याच शाळांमध्ये घंटा वाजवली जात नाही. हे चित्र बदलायला हवं.

### आणि शाळा सुटण्याची नेमकी वेळ कोणती?

शाळा जशा सुरु होतात, तशाच सुटण्याविषयीसुद्धा फारच विचित्र प्रसंग सांगावे असे वाटतात. शनिवारी शाळा ७ ३० ते ११ वाजेपर्यंत असते. पण बऱ्यांच गावांत शिक्षक येतात सकाळी ८ वाजता आणि १० वाजता खिचडी दिली की शाळा सोडतात. सोमवार ते शुक्रवारी ४ वाजल्यापासूनच शाळा सोडायची लगबग सुरु होते. काही शिक्षक तर ४ ३० लाच शाळेतून बाहेर पडतात. म्हणजे किती वेळ अध्यापन होतं, आणि किती वेळ अध्यापन व्हायला हवं, हा सुद्धा प्रश्नच आहे.

### आपली शाळा अशी आहे का ? तपासून पहा.

१) शाळेची इमारत पक्की व सुव्यवस्थित आहे. २. शाळेत बाग - बगीचा, क्रीडांगण, खेळण्याची साधने आहेत. ३. शाळेला संरक्षण भिंत/कुंपण आहे. ४. शाळेत पिण्याच्या पाण्याची सोय आहे. वीज आहे. ५. शाळेत मुलांसाठी/मुलींसाठी स्वतंत्र शौचालय, पाण्याची व्यवस्था आहे. ६. शाळा स्वच्छ व सुंदर आहे. ७. शाळेत बालवाचनालय असून प्रत्येक मूल त्याचा उपयोग करते. ८. शिक्षक गावातील सामाजिक व सांस्कृतिक कार्यात सहभागी होतात. ९. अभ्यासात मागे असणाऱ्या मुलांसाठी शिक्षक गावातील मंडळींच्या मदतीने अतिरिक्त पूरक मार्गदर्शन वर्ग चालवितात. १०. शिक्षक विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेबाबत जागरूक आहेत. ११. शालेय क्रीडास्पर्धा घेतल्या जातात. १२. शिक्षक शाळेत वेळेवर येतात व जातात. १३. ६ ते १४ वयोगटातील सर्व मुले शाळेच्या पटावर नोंदली गेली आहेत. १३. मुलांची दैनिक उपस्थिती नियमितपणे १०० % राहते. फक्त आजारी मुलेच अनुपस्थित राहतात.



---